प्रेसनोट

जळगाव जिल्हा पोलीस

दि. 18/02/2025

प्रति,

दै.---------- संपादक सो,

जळगाव.

विषय :- **एमआयडीसी पोस्टे ची कामगीरी – दोन वेगवेगळया कंपनीत घरफोडी चोरी करणारे दोन टोळ्या अटकेत.**

जळगाव जिल्हयामध्ये कंपनीमध्ये चोरीच्या घटना वाढत असल्यामुळे मा. पोलीस अधीक्षक श्री महेश्वर रेड्डी सो, मा अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते सो, यांनी चोरीच्या घटना उघडकिस आणुन आरोपी अटक करणेबाबत मार्गदर्शन केले होते. त्याप्रमाणे मा उपविभागीय पोलीस अधिकारी संदीप गावीत सो, पोलीस निरीक्षक संदीप पाटील सो, यांनी गुन्हे शोधपथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना कंपनीतील चोरीचे गुन्हे उघडकिस आणण्याच्या सुचना केल्या होत्या.

एमआयडीसी परीसरातील दोन वेगवेगळया एक साई प्रेरणा इंडस्ट्रीज आणी महालक्ष्मी युनी एक्झीम या कंपनीत रात्रीचे वेळेस अज्ञात चोरटयांनी प्रवेश करुन चोरी केल्याची घटना घडलेल्या होत्या. त्यात साई प्रेरणा इंडस्ट्रीज या कंपनीतुन 3,03,000/-रुपये किंमतीचे कंपनीत असलेले तांब्याच्या व ॲल्युमीनीयमच्या वायरींग, ईलेक्ट्रीक मोटार, हीट कंट्रोलर, पॅनल,लोखंडी पॅनल, लोखंडी बिम रोल, दोन गेअर बॉक्स, ट्रांन्सफॉर्मर, प्लास्टीकच्या 30 भरलेल्या व्हर्जीनच्या दाण्याच्या बॅगा असा मुद्देमाल चोरी झाल्याचे फिर्यादीवरुन 1) **90/2025** बीएनएस कलम 305(अ), 331(3) प्रमाणे गुन्हा दाखल आहे. तसेच एन/98 मधील महालक्ष्मी युनी एक्झीम कंपनीतील 50,000/-रुपये किंमतीचे 02 किलो चांदी चे साहीत्य त्यात – पुजेसाठी ठेवलेले चांदीचे भांडे त्यात, 1 किलो वजनाचे चांदीचे नाणे, पुजेसाठी वापरले जाणारे ताट, घंटी, प्लेट, लोटा, अगरबत्ती स्टॅंड वगैरे असे एकुण 2 किलो वजनी चांदी व 60,000/- रुपये रोख असा मुद्देमाल चोरी झाला होता. त्यानुसार एमआयडीसी पोलीस स्टेशनला 2) **73/2025** बीएनएस कलम 305(अ), 331(3) प्रमाणे असे वेगवेगळे दोन गुन्हे दाखल आहे.

गुन्हे दाखल झाल्यावर पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी गुन्हे शोधपथकातील पोलीस अंमलदार यांना सदर भागातील सीसीटीव्ही फुटेज तपासुन गुन्हा उघडकिस आणण्याच्या सुचना दिल्या होत्या, त्यानुसार गुन्हे शोधपथकातील पोलीस पथक यांनी सतत पाठपुरावा करुन गोपणीय बातमीच्या आधारे **साई प्रेरणा इंडस्ट्रीज** या कंपनीत चोरी करणारे संशईत नामे 1) उमेश उर्फ भावडया संतोष राजपुत, रा सुप्रीम कॉलनी जळगाव, 2) आकाश सुरेश शिंदे रा साईनगर कुसूंबा, 3) पृथ्वीराज उर्फ डुब-या बच्चन बागडे यांना त्यांचे राहते घरातुन सापळा रचुन दिनांक 09/02/2025 रोजी अटक केली. त्यांची पोलीस कस्टडी रीमांड घेवुन सदर संशईतांकडुन 1,11,500 /-रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास पोउपनि चंद्रकांत धनके पोका योगेश घुगे हे करीत आहे.

तसेच एन/98 मधील महालक्ष्मी युनी एक्झीम या कंपनीत चोरी करणारे संशईतांना सुध्दा गुन्हे शोधपथकातील पोलीस अधिकारी/अंमलदार यांनी गोपणीय बातमी काढुन सतत पाठपुरावा करुन सुप्रीम कॉलनी परीसरात राहणारे संशईत, 1) प्रकाश उर्फ गिड्डा काळु राठोड, 2) गोविंदा उर्फ लल्ला देविदास ढालवाले दोन्ही रा. सुप्रीम कॉलनी जळगाव यांना दिनांक 10/02/2025 रोजी गुन्हे शोधपथकातील अंमलदार यांच्या मदतीने ताब्यात घेवुन अटक करुन त्यांची दिनांक 15/02/2025 पर्यंत पोलीस कोठडी घेतली. पोलीस कोठडीत असतांना दोन्ही संशईतांनी सदर कंपनीत त्यांचे अजुन 03 साथीदारांसह गुन्हा केल्याची कबुली दिली. दोन्ही आरोपीतांनी त्यांच्या वाटयावर आलेल्या 35,000/- रुपये पैकि एकुण 22,000/- रुपये काढुन दिलेले आहे. फरार आरोपीतांचा शोध सुरु आहे. सदर गुन्हयाचा तपास पोउपनि राहुल तायडे, पोना योगेश बारी हे करीत आहे.

सदर दोन्ही गुन्हे हे मा. पोलीस अधिक्षक श्री. महेश्वर रेड्डी सो, मा अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते सो, मा उपविभागीय पोलीस अधिकारी संदीप गावीत सो, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप पाटील, पोउपनि राहुल तायडे, चंद्रकांत धनके, पोना योगेश बारी, किशोर पाटील, पोका सिध्देश्वर डापकर, छगन तायडे, किरण पाटील, नितीन ठाकुर, योगेश घुगे यांनी उघडकिस आणलेले आहे.

जनसंपर्क अधिकारी

पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव.